# ई - पोलीस पत्रिका

दि २०/०६/२०२२ अनु.क्र. ११३

## (अमरावती शहर पोलीसांची २०२२ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचेविरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

# भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/ रजा

१.पोआअ/आस्था-४/प्रशि/जलद पथक/६६९०/२०२२.दि.२०/०६/२०२२.

**विषय-** दि.१९/०५/२०२२ ते दि०.१/०६/२०२२ पर्यत फोर्स वन, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक फोर्स वन, प्रशिक्षण केंद्र,रारापोबल गट क्र.१ पुणे येथे आयोजीत जलद प्रतिसाद पथकाचे उजळणी प्रशिक्षणाबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भकींत विषयान्वये , दि.१९/०५/२०२२ ते दि.०१/०६/२०२२ या कालावधीत फोर्स वन प्रशिक्षण केंद्र, ,रारापोबल गट क्र.१ पुणे येथे आयोजीत ०२ आठवडयाचे जलद प्रतिसाद पथक उजळणी प्रशिक्षणाचे सहावे सत्र आयोजीत करण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | पद/ब.न. | अमंलदार नाव |
|---|---|---|
| १. | पोशि/५२९ | राजेश पुडलिकराव वाघमारे |
| २. | पोशि/२७४ | आशिष हरिराम कावरे |
| ३. | पोशि/१०८२ | आकाश लक्ष्मण पोकळे |
| ४. | पोशि/४७८ | ऋषीकेश प्रकाशराव धावडे |
| ५. | पोशि/१७८४ | सागर कैलासराव चव्हाण |
| ६. | पोशि/२८० | सुरज वामनराव भोयर |

२.**पोआअ/विचौ-१/गै.कसुरी/अ.आ./पोना/१३४० अरुण चव्हाण +४/६७८३/अअम.दि.२०/०६/२०२२**

## आदेश

**कसुरदाराचे नाव-१.**पोना/१३४० अरुण किसनराव चव्हाण,२.पोशि/ मुकेश भैय्यालाल यादव, ३.पोशि/१७१० पवन ओंकारराव जयपुरे , ४. पोशि/३३२ दत्तात्रय कारभारी मुंडे, ५. पोशि/१२३५ विजय वासुदेवराव तल्हार,सर्व नेमणूक- पो.मु., अमरावती शहर.

**थोडक्यात कसुर-**

तुम्ही वरील कसूरदार पोलीस मुख्यालय अमरावती शहर येथे नेमणुकीस असतांना दिनांक १८/०२/२०२१ रोजी अंध (विघालय तात्पुरते कारागृह) गार्ड कर्तव्यावर हजर असतांना कारागृहामधील बंदी क्र.९९४ शेख रशीद शेख वय वर्ष १९ रा.मिलवाळ नवी वस्ती बडनेरा यांने दि.१८/०२/२०२१ रोजी सकाळी ०४.३० वा कारागृहाचे बॅरेक क्र.०२ येथील खिडकीचे गजामधुन पलायन केलेले आहे.मध्यवर्ती कारागृह अमरावती येथील सुरक्षागार्डचे देखरेखीत असल्याने आपली गार्ड डयुटी असतांना सुरक्षेतेच्या दृष्टीने चारही बाजुले संतर्क राहुन डयुटी करणे जबाबदारीचे होते.परंतु तुम्ही संतर्क राहुन गार्ड डयुटी केल्याचे दिसुन येत नाही.अशा प्रकारे तुम्ही कर्तव्यावर असतांना बेजबाबदारपणा व दुर्लक्षपणा करुण गंभीर कसुरी केली आहे.सदर कसूराबाबत तुमची विभागीय चौकशी केली असता तुम्हास नेमूण दिलेले कर्तव्य नियताप्रमाणे केल्याचे दिसून आले नसुन कर्तव्यात कसुरी केल्याचे आढळून आले आहे.सदरची बाब अत्यंत गंभीर असून पोलीस खात्यास अशोभनीय आहे.

तुमच्या या बेशिस्तपणाचे व बेजबाबदारपणाच्या कसुरीबदूदल तुम्हास मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३(२) (५) चे तरतुदी नुसार देय वार्षीक वाढ १ (एक) वर्षाकरिता(परिणाम न होणारी) का रोखण्यात येवू नये म्हणून तुम्हास कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती.तुम्ही सदरच नोटीस तुम्ही स्विकारुण त्यावर आपले स्पस्ष्टीकरण सादर केले.तुम्ही सादर केलल्यो स्पस्ष्टीकरण ाचे सखोल अवलोकन केले असता ते समाधनकारक दिसून आले नाही .परंतु तुम्हास पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असून, तुम्हास प्रस्तावित कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेलया शिक्षेत अंशत बदल करुन खालील प्रमाणे शिक्षेचे अंतीम आदेश पारीत करण्यातं येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसूराबाबत कसूरदार अ.क्र. १ ते ५ यांना मुंबई पोलीस(शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ पोटनियम (२) मधील (४) चे तरतुदी नुसार रू.१,०००/- आर्थिक दंड ही शिक्षा देण्यात येत आह.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आतमा.अपर मुख्य सचिवख गृहविभाग,मंत्रालय,मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर कर शकता.

**३.पोआअ/आस्था-रजा/अ.र.रोखीकरण/७ पे.सुधारीत/६६८५/२०२२ दि.२०/०६/२०२२.**

संदर्भ- या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/आस्था-५/मयत पो.कर्म./अ.र.रोखीकरण/११७२५/२०१७ दि.०६.१०.२०१७.

*******

## सुधारीत आदेश

पोलीस आयुक्त ,अमरावती शहर आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकाला मयत झालेले आहेत.त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा(रजा)नियम १९८१ मधील नियम ६९ व वित्त विभाग, शासन निर्णय क्र.अरजा/२४०१/८/सेवा-९, दिनांक १५/०१/२०२१ मधील तरतुदीनुसार सेवेतून कमी झाल्याच्या दिनांकास त्याच्या रजा लेख्यात शिल्लक असलेल्या एकुण अर्जित

रजेचे रोखीकरणास ६ वेतन आयोगाचे असुधारीत वेतन संरचणेनुसार वरील संदर्भीय आदेशान्वये मंजुरी देण्यात आलेली आहे.

परंतु शासन निर्णय, वित्त विभाग क्र.अरजा-२०१९/प्र.क्र.१२/सेवा-६, दि.२४/०५/२०१९ अन्वये शासकीय कर्म-यांचे सुधारीत वेतन संरचनेतील वेतन विचारात धेवून त्यांना नियमाप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या शिल्लक रजेच्या संबंधातील रजा वेतनाची समतुलय रोख रक्कम, एका ठोक रकमेत रोखीन प्रदान करण्यात यावी. जर कर्मचारी यांस दि.०१/०१/२०१६ ते दिनांक ३१/०१/२०१९ या कालावधीत असुधारीत वेतनसंरचनेतील वेतनाच्या आधारे शिल्लक अर्जित रजेच्या रोख सममुल्याची रक्कम यापुर्वी अदा केलेली असल्यास, त्यांना या शासन या **शासन निर्णययाच्या अनुषंगाने फरकाची रक्कम,ठोक रकमेव्दारे रोख्ीने प्रदान करण्यात यावी असे निर्देश दिलेले आहे.**

| **अ.क्र** | **पोलीस कर्म-याचे नांव, पदनाम व ब.नं** | **सेवा समाप्तीच्या दिनांक** | **पुर्वीचा रोखीकरण मंजूरी आदेश क्र./दिनांक** | **शिल्लक अर्जित रजा** | **विघमान वेतन व ग्रेड पे** | **सुधारीत वेतन संरचना** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री.अक्षय विठठल गाडे,पोलीस शिपाई/१६१२ | **दि.१९/०५/२०१७ रोजी मयत झाले** | जा.क्र.११७२५/१७,दि. ०६.१०.२०१७ | १२६ | शेवटचे वेतन बँड ८७६०/- ग्रेड पे २,०००/- | वेतनस्त रएस-७, रू.२७, ६०० |

**उपरोक्त पोलीस कर्मचारी यांना विघमान वेतन बँड व ग्रेड वेतन आणि सुधारीत वेतन संरचना यामधील रोख सममुलय फरकाची रक्कम देय राहील.**

**(के.एल.शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहर करीता

प्रती, पत्रव्यवहार शाखा/ सेवापट नोंदणी लिपीक, आस्थापना शाखा/सीसीटीएनएस